ePaper

# खेडमध्ये मुसळधार पाऊस, जगबुडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली!



वर्ष - 8 । अंक -80 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 27सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- कानपूर कसोटीत पावसाचाच खेळ?
- पाकिस्तानीच्या हातात भारतीय ध्वज
- मोदी शक्तिशाली आहेत, पण देव नाहीत
- अमेरिकेची सूचना इस्रायलनं फेटाळली


# तळवडे येथील ‘बायोडायवर्व्हसिटी पार्क’ला प्रशासनाचा ‘ग्रीन सिग्नल’!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराच्या लौकीकात भर घालणारा ‘बायोडायवर्व्हसिटी पार्क’ (जैवविविधता उद्यान) तळवडे येथे विकसित करण्यात येत आहे. सुमारे ७० एकर जागेत होणारा हा प्रकल्पामुळे निगर्स परिसंस्थेचा जीर्णोद्धार होणार आहे. महानगरपालिका स्थायी समिती सभेत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मान्यता दिली आहे.**




भोसरी विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी तळवडे येथे ‘बायोडायवर्व्हसिटी पार्क’ विकसित करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी त्यांनी महानगरपालिका, राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. राज्य सरकारच्या ‘माझी वसुंधरा’ योजनेतून आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करण्यात येणार आहे.

महापालिका सहशहर अभियंता मनोज सेठिया म्हणाले की, तळवडे येथील जैवविविधता उद्यान मानव आणि निसर्ग यांच्यातील अधिक शाश्वत आणि सामंजस्यपूर्ण सहअस्तित्वाचा मार्ग प्रकाशित करेल. पुनर्संचयित उपक्रम, शैक्षणिक कार्यक्रम आणि सामुदायिक सहभाग याद्वारे पार्क जागरूक पर्यावरणीय कारभाराच्या परिवर्तनीय शक्तीचे उदाहरण देईल. या पुनरुज्जीवित लँडस्केपच्या सौंदर्याचा विचार करता भविष्यातील शहराच्या सौंदर्याला आकार देईल. जैवविविधतेचे संरक्षण ही केवळ गरज नाही, तर एक सामूहिक जबाबदारी आहे.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस अमृत गटात राज्य स्तरावर प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे. तसेच, भूमी थीमॅटिक पार्कमधील उच्चतम कामगिरीसाठीही बक्षीस मिळाले आहे. अशी एकूण १० कोटी रुपयांची रक्कम प्रकल्पाच्या विकासासाठी खर्च करण्यात येणार आहे. तसेच, उर्वरित खर्च केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीकरिता राज्यांना विशेष सहाय्य योजनेंतर्गत राज्य शासनास प्राप्त अर्थसहाय्य निधीमधून जैवविविधता उद्यान (बायोडायवर्व्हसिटी पार्क) विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य मिळवण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.

### .... असे आहे बायोडायवर्व्हसिटी पार्क

बायोडायव्हर्सिटी पार्कचे नियोजन सुमारे ७० एकर जागेत केले आहे. याठिकाणी देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. किंबहुना जंगल विकसित करण्यात येणार आहे. प्राणी, पक्षी अधिवास या ठिकाणी निर्माण करण्यात येणार आहे. मृदा संवर्धन, विविध थीमद्वारे वृक्षारोपण, एन्ट्रान्स गेट, बर्ड नेस्ट वॉल, पार्किंग, गोल्फ कार्ट अॅन्ड सायकल स्टेशन, ३ एन्ट्रान्स प्लाझा, ॲम्पिथिएटर, सोयुवेनिअर शॉप, वर्कशॉप, कॅपे, बटरफ्लाय गार्डन, रिपेरिअन ॲन्ड वेटलँन्डस, ऑर्चिडट्रम, थीम पार्क- कलर्स् अॅड कोअर फॉरेस्ट, टॉयलेट ब्लॉक्स, बायो डिझास्टर, किऑक्स, स्ट्रिम क्रॉसिंग, साइनेज, साईनेज ॲन्ड ग्राफीक फॉर इकॉलॉजी अवेअरनेस, बेन्चेस, लाईटिंग- जनरल लाईटींग, पाथवेज, पिकनिक स्पॉट, रेस्टॉरंट एरिआ, ब्रिज लाईटिंग, व्हिजीबिलीटी लाईटिंग फॉर साईट, पब्लिक ॲड्रेस सिस्टीम, वेस्ट मॅनेजमेंट, साईल ॲन्ड वेस्ट वॉटर मॅनेजमेंट असा अत्याधुनिक सोयी-सुविधांचा बायोडायव्हर्सिटी पार्क पिंपरी-चिंचवडच्या सौंदर्यामध्ये भर घालणार आहे.

“ पर्यावरण प्रदूषण वसुंधरेचा ऱ्हास रोखण्याचे आव्हान मानवजातीसमोर आहे. ‘चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर’ विकसित होत आहे. मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात येत आहेत. या परिस्थितीमध्ये पर्यावरणाचा समतोल टिकावा. महानगरपालिका, राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या सहयोगातून पिंपरी-चिंचवड परिसरातील जैवविविधता टिकावी. त्याचे संवर्धन व्हावे. निसर्ग परिसंस्थेचे जतन व्हावे. भावी पिढीला स्वच्छ हवा आणि नैसर्गिक सहवास लाभावा. या करिता जैवविविधता उद्यान विकसित करण्याचा संकल्प केला होता. त्याअनुशंगाने महानगरपालिका प्रशासनाने कार्यवाही सुरू केली.

**–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# मोदींना वाचवा, त्यांच्या जीवाला धोका!

## पुणे कंट्रोल रुमला कॉल आल्यानं यंत्रणांची धावाधाव

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवाला धोका आहे, असा कॉल एका तरुणाने गुरुवारी सकाळी आपत्कालीन नियंत्रण कक्षाला (९११) केला आणि सुरू झाली देशभरातील पोलिस यंत्रणांची धावाधाव. आपत्कालीन नियंत्रण कक्षातून हा कॉल राज्य पोलिस दलाला (११२) आला आणि तेथून पिंपरी-चिंचवड पोलिसांना आला. त्यांनतर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी तातडीने तपास करून थेरगाव परिसरातून एका अभियंता तरुणाला ताब्यात घेतले.

सचिन विजयकुमार मठपती (वय २४, सध्या रा. हडपसर, मूळ रा. उदगीर) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर वाकड पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज पुणे दौरा नियोजित होता. मेट्रोसह एकूण १२ प्रकल्पांचे लोकार्पण व भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार होते. मात्र, शहर परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे मोदी यांचा आजचा दौरा रद्द करण्यात आला. दरम्यान, गुरुवारी (२६ सप्टेंबर) सकाळी एका अभियंता तरुणाने ‘पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाचवा, त्यांच्या जीवाला धोका आहे, त्यांना मदत करा’ असा कॉल आपत्कालीन नियंत्रण कक्षाला केला. या कॉलनंतर राज्य पोलिस दलात एकच खळबळ उडाली. तांत्रिक तपासाद्वारे हा तरुण पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील थेरगाव परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, काही मिनिटांतच वाकड पोलिसांनी बस थांब्यावर बसची वाट पाहत असलेल्या तरुणाला ताब्यात घेतले. तरुण मूळचा उदगीर येथील असून, तो थेरगाव येथे त्याच्या मित्राकडे आला होता.

### मी तर मोदींचा फॅन...

तरुणाला ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी त्याची चौकशी केली. त्या वेळी ‘मी मोदींचा खूप मोठा फॅन आहे. मला त्यांची नेहमी काळजी वाटते; तसेच मी मोबाइल क्रोम ब्राउझरमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स सर्च करीत असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवाला धोका आहे. त्यांना पोलिस मदत हवी असल्याचे वाचले,’ असे तरुणाने सांगितले. दरम्यान, पोलिस सखोल चौकशी करीत आहेत.

# सोयाबीन, कडधान्यउत्पादक संकटात!

## राज्यातील बारा जिल्ह्यांतील 32997.30 हेक्टरवरील पिके मातीमोल

।पुणे । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खरीप हंगामातील पिकाचे मोठे नुकसान होत आहे. मंगळवारी (२४ सप्टेंबर) आणि बुधवारी (२५ सप्टेंबर) रोजी पडलेल्या पावसामुळे राज्यातील बारा जिल्ह्यांतील ३२९९७.३० हेक्टरवरील पिके मातीमोल झाली आहे. सोयाबीन पिकाचे नुकसान जास्त आहे.**



कृषी आयुक्तालयाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात मंगळवारी (२४ सप्टेंबर) आणि बुधवारी (२५ सप्टेंबर) सर्वदूर जोरदार पाऊस पडला. दोन दिवसांत बारा जिल्ह्यांतील ३२९९७.३० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. मराठवाड्याला सर्वाधिक फटका बसला आहे. बीडमध्ये आठ हजार हेक्टर, धाराशिवमध्ये सात हजार हेक्टर, नांदेडमध्ये पाच हजार हेक्टर, छत्रपती संभाजीनगरमध्ये ४ हजार ५०० हेक्टरचे नुकसान झाले आहे. मराठवाड्यानंतर सांगली जिल्ह्यात नुकसानीची तीव्रता जास्त आहे. सांगलीत ४ हजार ८६७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सोलापुरात ३ हजार २०० हेक्टर, पुण्यात ४३० हेक्टर, नगरमध्ये ९१६ हेक्टर, जळगावात ३१७ हेक्टर, नाशिकमध्ये २५ हेक्टर, धुळ्यात १ हजार ७० हेक्टर आणि पालघरमध्ये ५५.८० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.राज्यात दोन दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. राज्यात खरीप हंगामात सुमारे ५० लाख हेक्टरवर सोयाबीनची लागवड झाली आहे. विदर्भ, मराठवाड्यात सोयाबीनचे क्षेत्र जास्त आहे. नुकत्याच झालेल्या पावसात मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्रातील काढणीला आलेले सोयाबीन पीक भिजले आहे. सोयाबीन सलग चार-पाच दिवस भिजल्यामुळे सोयाबीनचे दाणे काळे पडू लागले आहेत. काढणीला मजूर मिळत नाहीत. त्यामुळे शेतातील सोयाबीन तसेच पडून आहे. सोयाबीनपाठोपाठ कडधान्याचे नुकसान झाले आहे. तूरवगळता सर्वच कडधान्याची काढणी अंतिम टप्प्यात आहे. मराठवाडा, विदर्भात पूर्वहंगामी कापसाची वेचणी सुरू झाली आहे, तर सर्वत्र कापसाची बोंडे उमलली आहेत. सतत दोन-तीन दिवस भिजल्यामुळे कापूस काळा पडत आहे. सध्याच्या पावसात सोयाबीन, कडधान्ये, कापूस आणि कांदा पिकांचे नुकसान अधिक आहे.राज्यात दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसाचा फटका यवतमाळ, अकोला, बुलडाणा, नांदेड, बीड, धाराशिव, जालना, छत्रपती संभाजीनगर, सातारा, सांगली, सोलापूर, पुणे, नगर, जळगाव, नाशिक, पालघर आणि धुळे अशा १७ जिल्ह्यांना बसला आहे. या जिल्ह्यांतील बहुतेक तालुके आणि सर्कलमधील पिके बाधित झाली आहेत. बाधित जिल्ह्यांत सोयाबीन, कडधान्ये, कापूस आणि कांदा पिकाचे क्षेत्र जास्त आहे.मराठवाड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे काढणीला आलेल्या ४० टक्के सोयाबीन पिकाचे नुकसान झाले आहे. पाऊस उघडला तरीही शेतात पाणी साचल्यामुळे सोयाबीन काढता येत नाही. सलग चार-पाच दिवस सोयाबीन भिजल्यामुळे शेंगांमधून कोंब येऊ लागले आहेत.त्यामुळे नुकसानीचे प्रमाण वाढणार आहे, अशी माहिती चाकोली (ता. चाकूर) येथील प्रगतशील शेतकरी रमेश पाटील यांनी दिली.कृषी आयुक्तालयाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात मंगळवारी (२४ सप्टेंबर) आणि बुधवारी (२५ सप्टेंबर) सर्वदूर जोरदार पाऊस पडला. दोन दिवसांत बारा जिल्ह्यांतील ३२९९७.३० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. मराठवाड्याला सर्वाधिक फटका बसला आहे.

### खरीप हंगामातील पिकाचे नुकसान

बीडमध्ये आठ हजार हेक्टर, धाराशिवमध्ये सात हजार हेक्टर, नांदेडमध्ये पाच हजार हेक्टर, छत्रपती संभाजीनगरमध्ये ४ हजार ५०० हेक्टरचे नुकसान झाले आहे. मराठवाड्यानंतर सांगली जिल्ह्यात नुकसानीची तीव्रता जास्त आहे. सांगलीत ४ हजार ८६७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सोलापुरात ३ हजार २०० हेक्टर, पुण्यात ४३० हेक्टर, नगरमध्ये ९१६ हेक्टर, जळगावात ३१७ हेक्टर, नाशिकमध्ये २५ हेक्टर, धुळ्यात १ हजार ७० हेक्टर आणि पालघरमध्ये ५५.८० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खरीप हंगामातील पिकाचे मोठे नुकसान होत आहे.

# उद्यापासून पावसाचा जोर कमी होणार ?

## उत्तर कोकण, महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहणार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उत्तर महाराष्ट्रावर हवेची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. या चक्रीय स्थितीपासून उत्तर बांगलादेशपर्यंत हवेच्या कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळे उत्तर कोकण, उत्तर महाराष्ट्रात पावसाचा जोर आहे.**



शुक्रवारीही (२७ सप्टेंबर) या भागात पावसाचा जोर राहणार आहे. शनिवारपासून (२८ सप्टेंबर) राज्यात पावसाचा जोर कमी होणार आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नाशिक, धुळे, जळगाव जिल्ह्यांवर वाऱ्याची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. या चक्रीय स्थितीमुळे अरबी समुद्रातून मोठ्या प्रमाणावर बाष्प खेचले जात आहेत. या चक्रीय स्थितीपासून उत्तर बांगलादेशपर्यंत हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. त्यामुळे उत्तर कोकणातील मुंबई, ठाणे, पालघर. उत्तर महाराष्ट्रातील नगर, नाशिक, धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यांत पावसाचा जोर कायम राहणार आहे. हवामान विभागाने उत्तर कोकण आणि उत्तर महाराष्ट्राला नारंगी इशारा दिला आहे. त्यासह दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाला पिवळा इशारा दिला आहे. या भागात हलक्या पावसाचा अंदाज आहे.उत्तर महाराष्ट्रावरील वाऱ्याची चक्रीय स्थितीचा प्रभाव शुक्रवारी सायंकाळपासून कमी होईल. त्यामुळे शनिवारपासून राज्यातील पावसाचा जोर कमी होईल.

### उत्तर महाराष्ट्राला नारंगी इशारा

साधारणपणे दोन ऑक्टोबरपर्यंत राज्यात पावसाचा जोर कमी असेल, या काळात बहुतांश ठिकाणी पाऊस उघडीप देण्याचा अंदाज आहे.शुक्रवारीही (२७ सप्टेंबर) या भागात पावसाचा जोर राहणार आहे. शनिवारपासून (२८ सप्टेंबर) राज्यात पावसाचा जोर कमी होणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नाशिक, धुळे, जळगाव जिल्ह्यांवर वाऱ्याची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. या चक्रीय स्थितीमुळे अरबी समुद्रातून मोठ्या प्रमाणावर बाष्प खेचले जात आहेत. या चक्रीय स्थितीपासून उत्तर बांगलादेशपर्यंत हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. हवामान विभागाने उत्तर कोकण आणि उत्तर महाराष्ट्राला नारंगी इशारा दिला आहे.


## हरकती घेतलेल्या शेतकरी, भूमिपुत्रांना अखेर दिलासा

# बोऱ्हाडेवाडी 'टी.पी. स्कीम'मधून रहिवाशी क्षेत्र वगळले!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

| पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील वाढीव हद्दीतील मौजे बोऱ्हाडेवाडी येथे नगर रचना योजना (T.P. SCHEMES) मधून रहिवाशी क्षेत्र वगळण्याबाबतचा प्रस्तावाला महानगरपालिका सर्वसाधरण सभेत प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. रहिवाशी क्षेत्र वगळण्यात आल्यामुळे आता 'ग्रीन झोन'मध्ये टी.पी. स्कीम राबवण्यात येणार आहे. त्यामुळे भूमिपुत्रांना दिलासा मिळाला आहे.**






"बोऱ्हाडेवाडी गावातील निवासी क्षेत्र नगर रचना योजना (टी.पी. स्कीम) मधून वगळण्याबाबत काही शेतकऱ्यांनी आग्रही मागणी केली होती. त्यानुसार, महानरगपालिका प्रशासन, नगर रचना विभागाकडे पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. महानगरपालिका प्रशासनाने टी.पी. स्कीममधून विरोध असलेल्या नागरिकांचा भाग वगळण्याबाबत प्रस्तावाला मान्यता दिली आहे. रहिवाशी क्षेत्र वगळून टी.पी. स्कीम राबवण्यात येणार आहे. त्यामुळे बोऱ्हाडेवाडी-मोशी परिसराचा सर्वसमावेश विकासाला चालना मिळेल, असा विश्वास आहे.
**–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार महानगरपालिका प्रशासनाने नगर रचना योजना राबवण्यास सुरूवात केली होती. मात्र, बोऱ्हाडेवाडी येथील स्थानिक शेतकरी, भूमिपुत्र यांनी निवासी क्षेत्र या योजनेतून वगळवावे. या करिता योजनेला विरोध केला. भूमिपुत्रांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे या प्रकरणात पाठपुरावा करावा, अशी मागणी केली होती.

दरम्यान, भूमिपुत्रांचा विरोध असल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने टी.पी. स्कीममधून बोऱ्हाडेवाडीतील रहिवाशी क्षेत्र वगळावे. या करिता महानगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. नगर रचना योजनामध्ये बोऱ्हाडेवाडीतील गट क्र. ग. नं. ६६ , ६७ , ६९, ७०, ८३, ८६, ३१, ३०, ३२ बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये शेती विभागातून रहिवास विभागात फेरबदल झालेला असल्याने यास शुद्धीपत्रक करुन हा भाग योजनेतून वगळण्यात आलेला आहे. त्यामुळे आता टी.पी. स्किम रहिवाशी क्षेत्र वगळून राबवावी. या करिता आमदार महेश लांडगे यांनी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह आणि नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या मागणीनुसार,

---

## अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत बांधकाम कामगारांना मदत

### स्व. आमदार लक्ष्मण जगताप यांचा जनसेवेचा वसा अविरतपणे चालविणार–शंकर जगताप

| पिंपरी | प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास' या विचारातून समाजातील शेवटच्या घटकातील, तळागाळातील सर्वसामान्य, कष्टकरी, गरजू नागरिकांपर्यंत केंद्र शासन असो, राज्य शासन असो अथवा पिंपरी चिंचवड महानगरपालिका असेल या सर्वांच्या कल्याणकारी योजना पोहचविण्याची जबाबदारी आमच्यावर आहे आणि आम्ही ही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहोत. त्यामाध्यमातून लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांचा जनसेवेचा वसा आणि वारसा अविरतपणे चालविण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.**



पिंपळे गुरव येथील भाजप कार्यालयात अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत सुरक्षा संच आणि गृहोपयोगी भांड्यांचा संच वाटपाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी गुजरातचे आमदार तथा माजी मंत्री श्री. जयद्रथसिंह परमार, माजी आमदार श्री. महेश रावत, माजी आमदार श्री. राकेश शहा, माजी स्थायी समिती अध्यक्ष श्री. राजेंद्र राजापुरे, माजी नगरसेविका सौ. उषा मुंढे, माजी नगरसेवक श्री. सागर आंघोळकर, स्वीकृत नगरसेवक महेश जगताप, श्री. नरेश जगताप, श्री. शशिकांत दुधारे, श्री. राहुल जवळकर, श्री. अमर आदियाल, श्री. दीपक काशीद, प्रभाग अध्यक्षा सौ. माधवी शिंदे, कामगार आघाडीचे अध्यक्ष श्री. नामदेव पवार, श्री. उमेश सकटे, श्री. मनोजकुमार मारकड, श्री. भारत मदने, श्री. संजय मराठे, श्री. दिलीप कांबळे सर, श्री. गणेश जगताप, श्री. साई कोंढरे, श्री. निलेश अष्टेकर, श्री. प्रसाद कस्पटे, श्री.शिवाजी कदम, श्री.राजू लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जगताप म्हणाले की, यापूर्वीही लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या माध्यमातून शहरातील असंघटित कामगार, कष्टकरी वर्ग, घरेलू कामगार यांच्या आर्थिक सुरक्षेसाठी विमा योजना, साहित्य वाटप तसेच आरोग्य सुविधा पुरविण्यासंदर्भात उपक्रम राबविण्यात आले होते. लक्ष्मणभाऊंनंतर हा उपक्रम यापुढेही अखंडपणे सुरू ठेवण्याची जबाबदारीही आम्ही पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहोत. शहरातील सर्वसामान्य असंघटित कामगार, घरेलू कामगार आणि कष्टकरी वर्गाच्या पाठीशी आम्ही भक्कमपणे उभे आहोत.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्या माध्यमातून मागील वर्षी अटल सन्मान योजनेंतर्गत पिंपरीमध्ये साडे सात हजार कामगारांना गृहोपयोगी भांडी वाटप करण्यात आले होते. त्याचे नियोजन दीपक म्हेत्रे यांनी केले होते. तर सांगवीमध्ये मागील वर्षी २ हजार तर यावर्षी पुन्हा एकदा २,१५३ कष्टकऱ्यांना या अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत या भांड्यांच्या संचचे वाटप करण्यात आले. याचे नियोजन अनिल कांबळे यांनी केले. त्याबद्दल कांबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी कौतुक केले.

आतापर्यंत अनेक असंघटित कामगारांनी आपली नोंद केलेली नाही त्यामुळे ते अजूनही या योजनेपासून वंचित आहेत.

### संपूर्ण प्रशिक्षण विनामूल्य देणार

भविष्यात आम्ही या घरेलू कामगार, सफाई कामगार, वाहन चालक यांना एक विशेष प्रशिक्षण देणार आहोत. थोडक्यात घरेलू काम करणाऱ्या भगिनींना सध्या घरोघरी वापरण्यात येणारी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणे आहेत ती उपकरणे कशी चालवावीत यासंदर्भात हे प्रशिक्षण असेल. त्याचबरोबर प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांना एक प्रमाणपत्रही देण्यात येईल. जेणेकरून या भगिनींना त्यांच्या कामाचा चांगला मोबदला कामाच्या ठिकाणी मिळेल. अशाच पद्धतीचे प्रशिक्षण वाहन चालक असतील किंवा इतर कामगार त्यांनाही देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे हे संपूर्ण प्रशिक्षण विनामूल्य आम्ही देणार असल्याचेही शंकर जगताप यांनी यावेळी सांगितले.

# नवीन शैक्षणिक धोरण उत्तम आहेच



**भूमिका**

**नवीन शैक्षणिक धोरणाला केंद्र सरकारने २९ जुलै, २०२० रोजी मान्यता दिली व ते २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात अस्तित्वात आले. या धोरणाचा उद्देश २०३०पर्यंत भारतीय शिक्षण व्यवस्थेत संपूर्ण परिवर्तन घडवून आणण्याच्या असल्याने याला एक नवीन दिशा देणारे आणि 'गेम-चेंजर' दस्तावेज म्हणून संबोधले जाते. हे नवीन शैक्षणिक धोरण राबविताना, अनेक आव्हाने समोर येत आहेत.**

भारतीय शैक्षणिक व्यवस्थेला उन्नत करण्यासाठी प्रगतीशील बदल, आंतरराष्ट्रीय मानकांसाठी वचनबद्धता, आधुनिक प्रशिक्षण पद्धतींचा व तंत्रज्ञानाचा प्रभावी अवलंब करून विद्यार्थ्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी व्यावहारिक आणि समकालीन कौशल्ये प्रदान करणारी शिक्षण व्यवस्था तयार करणे हा नव्या शैक्षणिक धोरणाचा उद्देश आहे. या धोरणात बहुविद्याशाखीय दृष्टिकोन प्रतिबिंबित झाला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना विविध विषयांमध्ये एकाच वेळी अध्ययन करणे शक्य होणार आहे. असे असले तरी बरीच आव्हानेही आहेत. ती खालील प्रमाणे-विद्यार्थ्यांना विविध विषयांमध्ये एकाच वेळी अध्ययन करण्याची संधी मिळेल, परंतु व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर अधिक भर दिल्याने, कला आणि सामाजिक विज्ञान या विषयांवर कमी लक्ष दिले जाण्याची शक्यता आहे.



त्यामुळे विद्यार्थ्यांच्या एकूण बौद्धिक आणि सर्जनशील वाढीस अडथळा येऊ शकते, ही भीतीही आहे. तसेच एकाच वेळी, विविध विद्याशाखांतील विषयांच्या अध्यायनामुळे, विद्यार्थी, 'जॅक ऑफ ऑल अँड मास्टर ऑफ नन' होण्याची शक्यता नाकारता येत नाही.नवीन शैक्षणिक धोरणात, प्रत्येक विद्यार्थ्याला एक मेजर, एक मायनर, एक जेनरिक/ ओपन इलेक्टिव्ह, एक व्यवसाय व कौशल्यवर्धनासंबंधित विषय, क्षमता वृद्धिंगत अभ्यासक्रम, भारतीय ज्ञान प्रणाली आणि मूल्य शिक्षण अभ्यासक्रम इत्यादींमधून क्रेडिट्स (गुण) प्राप्त करावी लागणार आहेत. त्याच बरोबर इंटर्नशिप/ फील्ड प्रोजेक्ट/ शिक्षणार्थी/ सामुदायिक प्रतिबद्धता आणि प्रमुख विषयाशी संबंधित सेवा, सह-अभ्यासक्रम आणि संशोधन प्रकल्पही अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. एवढे सर्व अभ्यासक्रमात समाविष्ट असल्याने, मेजर (मुख्य) विषयातील बराचसा आवश्यक भाग अभ्यासक्रमात घेणे शक्य न झाल्याचे मत बहुतांश शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. मेजर विषय हा महत्त्वाचा असूनही त्यातील महत्त्वाचे भाग अभ्यासक्रमात न आल्याने अभ्यासक्रमाचा दर्जा घसरल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना एकाचवेळी एवढ्या विविध उपक्रमांतून क्रेडिट्स (गुण) मिळविणे कितपत झेपेल या प्रश्नाचे उत्तर काळच देईल.नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षकांच्या प्रशिक्षणावर भर दिला गेला आहे. सतत व्यावसायिक विकास आणि प्रोत्साहनांसाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वांचा अभाव वर्गखोल्यांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम करू शकतो. मोठ्या संख्येने असलेल्या शिक्षकांच्या दर्जेदार प्रशिक्षणाची व्यवस्था कमी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.देशभरातील शिक्षणाचे प्रमाणीकरण (स्टँडर्डायझेशन) करण्याच्या धोरणामुळे प्रादेशिक आणि सांस्कृतिक विविधतेकडे दुर्लक्ष होऊ शकते. सर्वसामान्य एकच दृष्टीकोन, कदाचित भिन्न राज्ये आणि प्रदेशांतील विद्यार्थ्यांच्या अद्वितीय गरजा आणि आकांक्षा पूर्ण करू शकणार नाहीत, अशी शंका उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.शिक्षण प्रक्रियेत कोणतीही संकल्पना मातृभाषेतील समजावून घेणे सुलभ असते व त्यामुळे विद्यार्थ्यांचा आकलनाचा प्रवास सुलभ आणि समृद्ध होतो. यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात, शिक्षण मातृभाषेतून देण्याचा मानस आहे. यात प्रामुख्याने व्यावसायिक शिक्षण, जसे आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन शाखा इत्यादी, मातृभाषेत घेणाऱ्यांची पंचाईत होऊ शकते. आजपर्यंत व्यावसायिक शिक्षण जे इंग्रजी भाषेत शिकवले जात होते, ते आता देशातील विविध प्रांतांत, त्या त्या प्रांतांतील मातृभाषेत देण्याचा मानस आहे. विविध व्यावसायिक शाखांतील विषयांची पुस्तके, अभ्यास साहित्य व संदर्भ ग्रंथ हे इंग्रजी भाषेत मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत.

---

**प्रासंगिक »**

## ते देखे योगी!

***उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ हे योगी आहेत. आदित्यनाथ हेदेखील त्यांचे खरे नाव नाही. त्यांचे मूळ नाव अजय मोहन सिंग बिश्त.***

या अजय मोहन सिंग बिश्त या व्यक्तीचे रूपांतर ज्या वेळी योगी आदित्यनाथ असे होताना त्यांस अर्थातच काही अतींद्रिय शक्ती गवसल्या असणार. हे असे होते. म्हणून योगी हे नेहमीच सर्वसामान्यापेक्षा काही अंगुळे तरी अधिक सक्षम. त्यात हे तर योगी, त्यात राजकारणी आणि त्यातही भारतीय प्रथा-परंपरा यांचे जाज्वल्य पाईक असलेल्या भारतीय जनता पक्षाचे नेते. त्यामुळे सामान्य व्यक्तीच काय; पण सामान्य योग्यापेक्षाही त्यांच्या जीवन-जाणिवा अधिक असणार हे अमान्य करता येणार नाही. पण त्यांची ही अतींद्रिय क्षमता त्यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनासही प्राप्त झालेली आहे किंवा काय? हा प्रश्न पडण्याचे तात्कालिक कारण म्हणजे उत्तर प्रदेशात खाद्यान्न सेवा पुरवणाऱ्या सर्वांनी अन्नदात्याचा नामोल्लेख ठसठशीतपणे फलकावर केला जावा, असा त्यांनी काढलेला आदेश. वरवर पाहता राज्याचे मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी असे केले त्यात गैर ते काय?

---

तिसऱ्या आघाडीचा येत्या विधानसभा निवडणुकीवरील परिणाम या विषयावर बरीच साधकबाधक चर्चा सुरू आहे. कोल्हापूरचे संभाजीराजे, शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी व प्रहारचे बच्चू कडू यांनी तिसरी आघाडी प्रसवली आहे. त्यांची पार्श्वभूमी तपासली तर काय समोर येतं?

# तिसऱ्या आघाडीचा घाट केवळ अहंभावामुळे?

तेव्हाच्या राष्ट्रवादीतल्या साताऱ्याच्या उदयनराजेंना 'बॅलन्स' करण्यासाठी फडणवीसांनी छत्रपती घराण्यातील संभाजीराजेंना खासदारकी दिली. ती मुदत संपल्यावर त्यांना वाऱ्यावर सोडलं. ते मग खासदारकीसाठी उद्धव ठाकरेंकडे गेले. ठाकरेंनी स्वाभाविकच संभाजीराजेंना शिवसेना प्रवेशाची अट घातली. ती संभाजीराजेंनी अव्हेरली. यावेळी त्यांना डावलून पवारांनी त्यांच्या पिताजींना, आदरणीय शाहू महाराजांना (ठाकरेंना कोल्हापूरची जागा सोडायला पटवून) काँग्रेसचं तिकीट दिलं व ते निवडूनही आले. उदयनराजे भाजपमध्ये आले, त्यामुळे भाजपच्या दृष्टीने संभाजीराजेंची उपयुक्तता संपली. राजू शेट्टींना लोकसभेच्या निडणुकीत हातकणंगलेतून स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे निवडणूक लढवायची होती आणि तिथे मविआत उबाठा सेनेचा दावा असल्यामुळे त्यांचा पाठिंबा हवा होता. पण शेट्टींनी मशाल चिन्हावरच निवडणूक लढवावी म्हणून उद्धव अडून



बसले. या ठाकरेंच्या चुकीच्या निर्णयाने सीट तर शिंदेसेनेला गेलीच, पण राजू शेट्टीही विरोधात गेले. बच्चू कडू यांचा प्रकार वेगळाच आहे. शिवसेना फुटली तेंव्हा बच्चू कडू शिंदे गटात सामील होताना म्हणाले, 'फडणवीसांचा फोन आला म्हणून गुवाहाटीला आलो'. त्यानंतर लोकसभेला त्यांनी अमरावती मतदारसंघात आपला उमेदवार उभा केला, भाजपच्या उमेदवारांविरुद्ध प्रचार केला. तिथे मविआचा उमेदवार निवडून आला. त्यामुळे बच्चू कडू सध्या काय करतील, हे त्यांचं त्यांनाही सांगता येत नाही. छत्रपती संभाजीराजे, राजू शेट्टी व बच्चू कडू हे असे आपापल्या स्वार्थापोटी एकत्र आले आहेत. यांचा राग उद्धव व पवारांवर आहे. आता असं गृहीतक मांडलं जातं की या तिघांच्या तिसऱ्या (कथित) आघाडीचा फायदा भाजपप्रणीत महायुतीला होईल, पण हेच मुळात चुकीचं वाटतं. शेट्टींनी मविआविरोधात निवडणूक लढवली, संभाजीराजेंची सहानुभूती भाजपकडे आहे, बच्चू कडू महायुतीचा भाग आहेत, त्यामुळे त्यांचे मतदार हे महायुतीबद्धल सहानुभूती असणारेच आहेत. अशा स्थितीत त्यांचे उमेदवार महायुतीचीच मते खातील, असे वाटते. अर्थात मुळात यांना जनाधार किती मिळेल हाच लाखमोलाचा प्रश्न आहे. कारण वंचित बहुजन आघाडी वेळोवेळी भाजप विरोधकांबरोबर निवडणूक लढवायची चर्चा करते, पण शेवटी ती 'फिसकटवून' आपले स्वतंत्र उमेदवार उभे करते. यावेळी तेही तिसऱ्या आघाडीची गोष्ट करताहेत व त्याचबरोबर आपले मतदारसंघ व उमेदवारही जाहीर करताहेत. वंचितला अपयश येतं, यापेक्षा महत्वाचे म्हणजे दर निवडणुकीत त्यांचा मताचा टक्का घटतोय.

---

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एक तर तू राहशील किंवा मी!

## उद्धव ठाकरेंच्या आव्हानाला देवेंद्र फडणवीसांचं उत्तर

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाराष्ट्राचं राजकारण हे नव्या वळणावर आलं आहे. लवकरच महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक जाहीर होईल. २०१९ च्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाआघाडी असा सामना होता. यावेळी परिस्थिती तशी नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष फुटले आहेत. दोन्ही पक्षांचा एक एक भाग सत्तेत आणि विरोधात आहे. लोकसभा निवडणुकीत ३० जागा जिंकल्याने महाविकास आघाडीचा आत्मविश्वास प्रचंड दुणावला आहे. काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरेंनी एक तर तू राहशील किंवा मी राहिन असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांना खुलं आव्हान दिलं होतं. आता या आव्हानाला प्रतिआव्हान देऊन देवेंद्र फडणवीसयांनी उद्धव ठाकरेंना उत्तर दिलं आहे.**





उद्धव ठाकरेंनी ३१ जुलैच्या दिवशी मुंबईतल्या रंगशारदा या ठिकाणी मेळावा घेतला. या मेळाव्यात त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आणि त्यांना जोरदार आव्हानही दिलं. “मला आणि आदित्यला तुरुंगात टाकण्यासाठी देवेंद्र फडणवीस डाव आखत होते. मात्र मी सगळं काही सहन करुन उभा राहिलो आहे. मी तडफेने उतरलो आहे. आता एक तर तू राहशील किंवा मी राहिन. गीतेमध्येही हेच आहे. अर्जुनाने पाहिलं की त्याच्यासमोर त्याचे नातेवाईकच उभे आहेत तेव्हा त्यालाही यातनाच झाल्या होत्या. मलाही यातना होत नसतील का? पण भाजपा म्हणजे चोर कंपनी आहे.” असं वक्तव्य उद्धव ठाकरेंनी केलं होतं. तसंच उद्धव ठाकरे असंही म्हणाले होते की आपल्यासाठी हे शेवटचं आव्हान आहे, त्यानंतर आपल्याला आव्हान देणारं कुणीही राहणारं नाही. शिवसेना ही गंजलेली तलवार नाही तर तळपती तलवार आहे असंही उद्धव ठाकरे म्हणाले होते. याबाबत देवेंद्र फडणवीस यांना विचारलं असता त्यांनी यावर उत्तर दिलं आहे.उद्धव ठाकरे आणि तुमच्यातला वाद विकोपाला गेला आहे. मध्यंतरी त्यांनी तुम्हाला आव्हानही दिलं की तू राहशील किंवा मी राहिन याबाबत काय सांगाल? असं विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, “उद्धव ठाकरेही राहतील आणि मी पण राहिन. कोण कुठे जाणार आहे? राजकारणात कुणीही कुणाला संपवू शकत नाही. हां जनता मात्र राजकीयदृष्ट्या तुम्हाला संपवू शकते.

त्याशिवाय कुणीही काहीच करु शकत नाही. उद्धव ठाकरेंना वाटत असेल तर त्यांनी मला राजकीयदृष्ट्या संपवण्याचा प्रयत्न करुन बघावा. जोपर्यंत जनतेचा आशीर्वाद माझ्या पाठिशी आहे तोपर्यंत कुणीही मला राजकीयदृष्ट्या संपवू शकत नाही. मला तुम्ही अभिमन्यू म्हणालात पण मी सांगू इच्छितो की मी आधुनिक अभिमन्यू आहे. मला चक्रव्युहात शिरणंही ठाऊक आहे आणि तो भेदून बाहेर कसं यायचं हे देखील माहीत आहे. तो चक्रव्यूह भेदून दाखवेन. अभिमन्यू कौरवांच्या विरोधात लढला होता, मी देखील कौरवांच्या विरोधातच लढतो आहे.” असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी इंडिया टुडे कॉनक्लेव्ह मध्ये हे वक्तव्य केलं आहे. “मला आणि आदित्यला तुरुंगात टाकण्यासाठी देवेंद्र फडणवीस डाव आखत होते. मात्र मी सगळं काही सहन करुन उभा राहिलो आहे. मी तडफेने उतरलो आहे. आता एक तर तू राहशील किंवा मी राहिन. गीतेमध्येही हेच आहे. अर्जुनाने पाहिलं की त्याच्यासमोर त्याचे नातेवाईकच उभे आहेत तेव्हा त्यालाही यातनाच झाल्या होत्या. मलाही यातना होत नसतील का? पण भाजपा म्हणजे चोर कंपनी विचारलं असता त्यांनी यावर उत्तर दिलं आहे.

### काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?

“उद्धव ठाकरेही राहतील आणि मी पण राहिन. कोण कुठे जाणार आहे? राजकारणात कुणीही कुणाला संपवू शकत नाही. हां जनता मात्र राजकीयदृष्ट्या तुम्हाला संपवू शकते. त्याशिवाय कुणीही काहीच करु शकत नाही. उद्धव ठाकरेंना वाटत असेल तर त्यांनी मला राजकीयदृष्ट्या संपवण्याचा प्रयत्न करुन बघावा. महाराष्ट्राचं राजकारण हे नव्या वळणावर आलं आहे. लवकरच महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक जाहीर होईल. २०१९ च्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाआघाडी असा सामना होता. यावेळी परिस्थिती तशी नाही.

# असा पोरकटपणा करणार असाल तर...

## कार्यकर्त्यांनी घोषणा देताच संतापले जयंत पाटील

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**व्यासपीठावर भाषण करण्यासाठी उभं राहताच कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्याने जयंत पाटील संतापल्याचं बघायला मिळालं आहे. त्यानंतर जयंत पाटील यांनीही कार्यकर्त्यांना चांगलेच सुनावलं. शिवस्वराज्य यात्रेदरम्यान अकोले येथे आयोजित मेळाव्यात हा प्रकार घडला. या घटनेनंतर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत.**

काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून राज्यात शिवस्वराज्य यात्रेची सुरुवात करण्यात आली. या यात्रेंतर्गत आज अहमदनगरमधील आकोले येथे मेळाव्याचं आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरद पवार गट) प्रदेश अध्यक्ष जयंत पाटीलदेखील उपस्थित होते. यादरम्यान, जयंत पाटील हे भाषण देण्यासाठी व्यासपीठावर उभे राहिले. मात्र, त्यावेळी काही उत्साही कार्यकर्तांनी उमेदवार घोषित करण्यासंदर्भात घोषणा दिल्या.

घोषणा ऐकताच जयंत पाटील चांगलेच संतापले. घोषणा देणारा कोण आहे? त्याने हात वर करा, असं ते म्हणाले. तसेच मी याठिकाणी भाषण करणार नाही, असं म्हणत त्यांनी तिथून काढता पाय घेतला. मात्र, त्यानंतर स्थानिक नेत्यांनी त्यांची समजूत काढली आणि जयंत पाटील यांनी पुन्हा भाषण करण्यास सुरुवात केली. “असा पोरकटपणा करणार असाल, तर मी भाषण करणार नाही. इथे सगळ्यांची भाषणं झाली आहेत.

मला भाषण करण्यात रस नाही. मला पुढचेही कार्यक्रम आहेत. मी लगेच जातो”, असं म्हणत त्यांनी थेट कार्यकर्त्यांनाच सुनावलं.दरम्यान, यासंदर्भात बोलताना जयंत पाटील म्हणाले, “महाविकास आघाडीचे जागावाटप सुरू आहे. राज्यात २८८ मतदारसंघ आहेत. त्यामुळे थोडा उशीर होऊ शकतो. १ तारखेला जागावाटपावर शिक्कामोर्तब होईल. त्यानंतर आपल्या वाट्याला जे मतदारसंघ येतील तिथे उमेदवार जाहीर केली जातील.



### कार्यकर्त्यांना चांगलेच सुनावलं

मी जर असे उमेदवार घोषित करायला गेलो. तर महाविकास आघाडीत दोन मित्रपक्ष आहेत, ते आक्षेप घेतील. त्यामुळे काहीतरी तारतम्य बाळगायला पाहिजे, कारण आपल्याला आघाडी टिकवायची आहे” तसेच “या मतदारसंघात कुणाला उभे करणार, हे जर तुला कळलं नसेल, तर तुझ्यासारखा येडा दुनियेत माणूस नाही मग”, असे ते म्हणाले. व्यासपीठावर भाषण करण्यासाठी उभं राहताच कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्याने जयंत पाटील संतापल्याचं बघायला मिळालं आहे. त्यानंतर जयंत पाटील यांनीही कार्यकर्त्यांना चांगलेच सुनावलं.

# मोदी शक्तिशाली आहेत, पण देव नाहीत!

## मला न्यायालयाचे आभार मानायचे आहेत: अरविंद केजरीवाल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी गुरुवारी विधानसभेत संबोधित केले. राजीनामा दिल्यानंतर प्रथमच त्यांनी दिल्ली विधानसभेला संबोधित करताना भारतीय जनता पक्षावर (भाजप) हल्ला चढवला. हिंदूस्थान टाईम्सने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**



### न्यायालयाचे आभार मानायचे आहेत

मला न्यायालयाचे आभार मानायचे आहेत”, असं अरविंद केजरीवाल म्हणाले.एकेकाळी मुख्यमंत्रिपदाच्या ‘नंबर वन’ खुर्चीवर विराजमान झालेल्या केजरीवाल यांना त्यांच्या पूर्वीच्या पदापासून काही अंतरावर ४१ क्रमांकाची जागा देण्यात आली. त्यांची उत्तराधिकारी आतिशी आता मुख्यमंत्रिपदावर विराजमान आहेत, तर केजरीवाल यांचे विश्वासू लेफ्टनंट मनीष सिसोदिया यांना त्यांच्या शेजारी ४० क्रमांकाची सीट देण्यात आली. मद्य वितरण योजनेतील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे आप पक्षाच्या अनेक नेत्यांवर कारवाई सुरू आहे. या करवाईनुसार मनिष सिसोदिया, अरविंद केजरीवाल यांना तुरुंगवास झाला आहे. केजरीवाल यांनी दावा केला की, भाजपाच्या एका वरिष्ठ नेत्याशी नुकत्याच झालेल्या संभाषणामुळे त्यांना आश्चर्य वाटले.

मी नेहमी म्हणतो की पंतप्रधान मोदी खूप शक्तिशाली आहेत आणि त्यांच्याकडे भरपूर संसाधने आहेत, पण मोदी हे देव नाहीत. देव आपल्यासोबत आहे. मला न्यायालयाचे आभार मानायचे आहेत”, असं अरविंद केजरीवाल म्हणाले.एकेकाळी मुख्यमंत्रिपदाच्या ‘नंबर वन’ खुर्चीवर विराजमान झालेल्या केजरीवाल यांना त्यांच्या पूर्वीच्या पदापासून काही अंतरावर ४१ क्रमांकाची जागा देण्यात आली. त्यांची उत्तराधिकारी आतिशी आता मुख्यमंत्रिपदावर विराजमान आहेत, तर केजरीवाल यांचे विश्वासू लेफ्टनंट मनीष सिसोदिया यांना त्यांच्या शेजारी ४० क्रमांकाची सीट देण्यात आली. मद्य वितरण योजनेतील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे आप पक्षाच्या अनेक नेत्यांवर कारवाई सुरू आहे. या करवाईनुसार मनिष सिसोदिया, अरविंद केजरीवाल यांना तुरुंगवास झाला आहे. केजरीवाल यांनी दावा केला की, भाजपाच्या एका वरिष्ठ नेत्याशी नुकत्याच झालेल्या संभाषणामुळे त्यांना आश्चर्य वाटले.“मी विचारले की मला अटक केल्याने त्यांना कशी मदत झाली.असं केजरीवाल म्हणाले. “त्यांनी मला जे सांगितले त्याचे मला आश्चर्य वाटले. दिल्लीतील लोकांचे जीवन उद्ध्वस्त करून आनंद साजरा करणारा असा हा कोणता पक्ष आहे, याचे मला आश्चर्य वाटते.”“मला तुरुंगात पाठवून त्यांनी दिल्लीतील कामे बंद पाडली. रस्त्यांचीही दुरवस्था झाली.

हा त्यांचा एकमेव हेतू होता. आज मी मुख्यमंत्री आतिषीजींसोबत दिल्ली विद्यापीठातील एका रस्त्याची पाहणी केली. हा रस्ताही लवकरच दुरुस्त केला जाईल, बाकीचे दिल्लीतील रस्तेही लवकरच दुरुस्त केले जातील, आता दिल्लीतील लोकांना काळजी करण्याची गरज नाही”, असे केजरीवाल यांनी X वर पोस्ट केले. मला न्यायालयाचे आभार मानायचे आहेत”, असं अरविंद केजरीवाल म्हणाले.एकेकाळी मुख्यमंत्रिपदाच्या ‘नंबर वन’ खुर्चीवर विराजमान झालेल्या केजरीवाल यांना त्यांच्या पूर्वीच्या पदापासून काही अंतरावर ४१ क्रमांकाची जागा देण्यात आली. त्यांची उत्तराधिकारी आतिशी आता मुख्यमंत्रिपदावर विराजमान आहेत, तर केजरीवाल यांचे विश्वासू लेफ्टनंट मनीष सिसोदिया यांना त्यांच्या शेजारी ४० क्रमांकाची सीट देण्यात आली. मद्य वितरण योजनेतील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे आप पक्षाच्या अनेक नेत्यांवर कारवाई सुरू आहे. या करवाईनुसार मनिष सिसोदिया, अरविंद केजरीवाल यांना तुरुंगवास झाला आहे. केजरीवाल यांनी दावा केला की, भाजपाच्या एका वरिष्ठ नेत्याशी नुकत्याच झालेल्या संभाषणामुळे त्यांना आश्चर्य वाटले.“मी विचारले की मला अटक केल्याने त्यांना कशी मदत झाली. त्यांनी मला सांगितले की त्यांनी मला अटक करून संपूर्ण दिल्ली सरकारला पायउतार केले”, असं केजरीवाल म्हणाले. “त्यांनी मला जे सांगितले त्याचे मला आश्चर्य वाटले. दिल्लीतील लोकांचे जीवन उद्ध्वस्त करून आनंद साजरा करणारा असा हा कोणता पक्ष आहे, याचे मला आश्चर्य वाटते.“दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी गुरुवारी विधानसभेत संबोधित केले.

राजीनामा दिल्यानंतर प्रथमच त्यांनी दिल्ली विधानसभेला संबोधित करताना भारतीय जनता पक्षावर (भाजप) हल्ला चढवला. हिंदूस्थान टाईम्सने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. “मनीष सिसोदिया आणि मला इथे पाहून विरोधी पक्षातील माझ्या सहकाऱ्यांना दु:ख झाले असेल. मी नेहमी म्हणतो की पंतप्रधान मोदी खूप शक्तिशाली आहेत आणि त्यांच्याकडे भरपूर संसाधने आहेत, पण मोदी हे देव नाहीत. देव आपल्यासोबत आहे.

# अमेरिकेची सूचना इस्रायलनं फेटाळली

## सर्वशक्तिनिशी हेजबोलाशी लढण्याचे लष्कराला आदेश!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लेबनॉनवरील हवाई हल्ले थांबवून २१ दिवसांच्या युद्धविरामाची घोषणा करावी, असा प्रस्ताव अमेरिका आणि फ्रान्स यांनी इस्रायल सरकारला दिला होता. मात्र, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला आहे. यासंदर्भात इस्रायलच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून माहिती देण्यात आली आहे.**






### 600 पेक्षा जास्त सैनिकांचा मृत्यू

या प्रस्तावाला ऑस्ट्रेलिया, कॅनडा, सौदी अरेबिया तसेच काही युरोपीय देशांनी समर्थन दिलं होतं. मात्र, आता इस्रायलने हा प्रस्ताव नाकारला.दरम्यान, इस्रायल आणि लेबनॉन २००६ पासून एकमेकांवर हल्ले करत आहेत. गेल्या आठवड्यात लेबनॉनमध्ये झालेल्या पेजरच्या स्फोटानंतर हा हल्ल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पेजरच्या स्फोटानंतर लेबनॉननेही इस्रायलवर क्षेपणास्र डागली होती. त्यानंतर प्रत्युत्तर म्हणून इस्रायलनेही लेबनॉनवर हल्ला केला. या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत ६०० पेक्षा जास्त हेजबोलाच्या सैनिकांचा मृत्यू झाला आहे.

याउलट हेजबोलाशी सर्वशक्तिनिशी लढण्याचे आदेश लष्कराला दिले असल्याचं इस्रायल सरकारकडून सांगण्यात आलं आहे. त्यामुळे दोन्ही देशांदरम्यान होणारे हल्ले इतक्यात थांबतील, याची शक्यता कमी आहे.‘द इंडियन एक्सप्रेस’ने दिलेल्या वृत्तानुसार, इस्रायलचे परराष्ट्र मंत्री कॅटझ यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. अमेरिका आणि फ्रान्सने युद्धविराम करण्यासंदर्भात दिलेला प्रस्ताव इस्रायलने फेटाळला आहे. जोपर्यंत हेजबोलाला संपवण्याचं आमचं लक्ष्य पूर्ण होणार नाही, तोपर्यंत उत्तर लेबनॉनवरील आमचे हल्ले सुरु राहतील. हेजबोलाशी आम्ही सर्वशक्तिनिशी लढत राहू, असे ते म्हणाले.अमेरिका आणि फ्रान्सने लेबनॉनवरील हल्ले थांबवण्याचा प्रस्ताव इस्रायल सरकारला दिला होता. युद्धविराम घोषित करून चर्चेतून मार्ग काढावा, अशी विनंती दोन्ही देशाकडून करण्यात आली होती.


# रोहितची मुलाखत



बॉलीवूडमधील आघाडीचा प्रसिद्ध दिग्दर्शक आणि निर्माता म्हणजे रोहित शेट्टी; परंतु एक दिग्दर्शक किंवा निर्माता म्हणूनच नाही तर 'खतरों के खिलाडी' या रिॲलिटी शोचा सूत्रसंचालक म्हणूनही रोहितने कायमच प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळवले आहे. या शोमधील स्पर्धकाची दमदार स्टंटबाजी कायम प्रेक्षकांना थक्क करणारी असते. नुकतेच या कार्यक्रमाचे १३ वे पर्व कलर्स हिंदी वाहिनीवर सुरू झाले आहे. त्यासंबंधी रोहितशी केलेली ही खास बातचीत... खरं तर 'खतरों के खिलाडी' या कार्यक्रमाच्या प्रत्येका नव्या पर्वातून आम्ही कायमच प्रेक्षकांसाठी बऱ्याच नवीन गोष्टी आणत असतो.

त्यामुळे साहजिकच या पर्वातही खूप काही नवीन गोष्टी आहेत आणि यापुढेही पाहायला मिळतील, हे मी नक्कीच सांगेन. हे पर्व आतापर्यंतच्या पर्वांमधील सर्वात मोठे पर्व असणार आहे. ५० दिवसांपेक्षा जास्त आम्ही याचे चित्रीकरण करत होतो आणि करायलच हवे, कारण दरवर्षी प्रेक्षकांचे खूप प्रेम या कार्यक्रमाला मिळते. हा एक लोकप्रिय असा रिॲलिटी शो आहे. प्रेक्षकांचे भरभरून प्रोत्साहन आम्हाला मिळते, याचा आनंद आहे. पुन्हा एकदा नवीन खेळाडूंबरोबर या आधी कधीही न पाहिलेल्या नवीन स्टंटस् प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत. -अर्थात ते कठीण आहे, पण प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठी फक्त माझाच नाही तर संपूर्ण टीमचा खूप मोलाचा वाटा आहे. विशेषतः अशा ॲक्शनवर आधारित शोमध्ये प्रत्येक पर्वात काहीतरी नवीन प्रेक्षकांसाठी घेऊन येणे हे नक्कीच सोपे काम नाही. ते खूप आव्हानात्मक असते, पण आमची संपूर्ण टीम जवळजवळ ६-७ महिने खूप मनापासून यासाठी काम करत असते आणि आपल्या टीमची साथ लाभणे खरंच खूप महत्त्वाचे असते. आम्ही सर्वच एकजुटीने काम करतो. त्यामुळे नवनवीन कल्पना समोर येतात. प्रत्येक पर्वातून प्रेक्षकांना खूप अपेक्षा असतात आणि प्रेक्षकांच्या जबाबदारीची आम्हालाही जाणीव असते. कदाचित यामुळेच प्रेक्षक आजवर या कार्यक्रमाशी जोडून आहेत .

# कार्तिक आर्यनचा गौरव!



प्यार का पंचनामापासून कार्तिक आर्यनची झालेली सुरुवात आता त्याला यशाच्या शिखरावर घेऊन गेली आहे. तो एक तारांकित अभिनेता झाला आहे. त्याच्या शब्दाला वजन आले आहे. प्रख्यात सेलिब्रेटी झाला आहे. सोशल मीडियावर त्याचा मोठा चाहतावर्ग आहे. त्याला फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. अशा कार्तिकच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. काही दिवसांपूर्वी कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणी यांचा सत्य प्रेम की कथा नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. समीर विद्वंस दिग्दर्शित या चित्रपटानं चांगली कमाई केली आहे. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसादही मिळाला आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटानं शंभर कोटींपेक्षा जास्त कमाई केल्याची आकडेवारी समोर आली आहे. यानंतर येत्या काळात कार्तिकचे मोठे प्रोजेक्ट चाहत्यांचे लक्ष वेधून घेणार आहे. कार्तिकनं गेल्या वर्षापासून त्याचा फॉरमॅट चेंज केल्याचे दिसून येत आहे. तो आता विनोदी आणि हलक्या फुलक्या विषयांवरील चित्रपटांकडे जास्त लक्ष केंद्रित करत असल्याचे दिसून आले आहे. कार्तिकच्या चित्रपटांचा चाहतावर्ग वेगळा आहे. त्यामुळे नव्या विषयाच्या चित्रपटांना प्रेक्षकांसमोर घेऊन येणाऱ्या कार्तिकच्या कलाकृतींना मोठी दाद मिळताना दिसते. आता कार्तिकच्या चाहत्यांसाठी एक गोड बातमी आहे. ती म्हणजे कार्तिकचा जागतिक पातळीवर होणारा गौरव. फिल्म इंडस्ट्रीमध्ये त्यानं दिलेल्या महत्वपूर्ण योगदानासाठी त्याला मेलबर्नमधील इंडियन फिल्म फेस्टिव्हल मध्ये गौरविण्यात येणार आहे. आयएफएफएम कडून हा गौरव होणार असल्याची माहिती सुत्रांकडून देण्यात आली आहे. बॉलीवूडमधील सध्याच्या घडीला लिस्ट ए मधील कलाकारांमध्ये कार्तिक आर्यनचे नाव घेतले जाते. कार्तिकला आता रायझिंग ग्लोबल सुपरायझर स्टार ऑफ इंडियन सिनेमा या पुरस्कारानं गौरविण्यात येणार आहे. व्हिक्टोरिया सरकारकडून पुढील महिन्यात अकरा तारखेला या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. बॉलीवूडपटांचे प्रसिद्ध समीक्षक तरण आदर्श यांनी ट्विटद्वारे ही गोड बातमी चाहत्यांना दिली आहे.

# तमन्नाकडे सर्वात मोठा हिरा!



साऊथमध्ये आपल्या अभिनयाची छाप सोडल्यानंतर तमन्ना भाटियाने आता बॉलिवूडकडे तिचा मोर्चा वळवला. खुप कमी वेळात ती बॉलिवूडमधलं ही एक प्रसिद्ध नाव बनली आहे. गेल्या काही दिवसांपासून तमन्नाची खुपच चर्चा आहे. नुकतीच तमन्ना 'जी कारदा' आणि 'लस्ट स्टोरीज 2' या वेब सीरिजमध्ये दिसली होती. या दोन्ही वेबसिरिजमधील तिच्या बोल्ड सीनची बरीच चर्चा झाली होती. तमन्ना तिच्या उत्तम अभिनयासोबतच सौंदर्य आणि वेगवेगळ्या भुमिकांसाठीही ओळखली जाते. तमन्नाची फॅशन आणि स्टाईल लोकांना खूप आकर्षित करते. यासोबतच तिला हिऱ्यांच्या दागिन्यांची खूप आवड आहे. तिच्याकडे सर्वात महागडे दागिने असून त्यात एक हिरा असा आहे जो जगातील पाचव्या क्रमांकाचा हिरा असल्याचं बोलल जात आहे. मीडिया रिपोर्ट्समध्ये दिलेल्या माहितीनुसार, तमन्ना भाटियाकडे जगातील पाचव्या क्रमांकाची डायमंड असलेली भली मोठी अंगठी आहे. ज्यामध्ये एक मोठा हिरा जडलेला आहे. या हिऱ्याची किंमत 2 कोटी रुपये असल्याचा दावा करण्यात आला आहे. या अंगठीतील हिऱ्याचा आकार अतिशय सुंदर आहे जो खुपच चमकदार आणि सुंदर कलाकृतीचा आहे. एका अहवालानुसार, तमन्नाला ही हिऱ्याची अंगठी 2019 मध्ये दक्षिण सुपरस्टार राम चरणची पत्नी उपासना कामिनेनी भेट दिली होती. SYE RAA NARASIMHA REDDY या चित्रपटातील तमन्नाच्या उत्कृष्ट अभिनयाने प्रभावित होऊन उपासनाने तिला ही हिऱ्यांची अंगठी भेट दिली. उपासनाने तिच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तमन्ना भाटियाचा हिऱ्याची अंगठी असलेला फोटो शेअर केला आहे. त्या पोस्टमध्ये तमन्नाने धन्यवाद म्हटले आहे. ती विजय वर्माला डेट करत असल्याच तिने सांगितलं आहे. तमन्ना भाटियाचा विजय वर्मासोबतचा लस्ट स्टोरीज 2 नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. त्याचबरोबर तिचा चिरंजीवीसोबतचा 'भोला शंकर' हा चित्रपट ऑगस्टमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# मौत का सौदागर

बॉलीवूडचा किंग खान हा त्याच्या जवान नावाच्या चित्रपटामुळे चर्चेत आला आहे. काही दिवसांपूर्वी जवानचा टीझर व्हायरल झाला होता. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. पठाणला बॉक्स ऑफिसवर मिळालेलं यश जवानच्या वेळेस कायम राहणार का याची चाहत्यांना कमालीची उत्सुकता आहे. जवानमध्ये खलनायकाच्या भूमिकेत असलेल्या विजय सेतूपतीची चर्चा होत आहे. त्याचा लूक आता नेटकऱ्यांच्या भेटीला आला आहे. यापूर्वी विजयनं बॉलीवूडमधील काही चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. नुकतीच त्याची फर्जी नावाची वेबसीरिज येऊन गेली. जवान'च्या नवीन पोस्टरच्या वाढत्या अपेक्षेदरम्यान, चित्रपटाचा मुख्य अभिनेता शाहरुख खानने खलनायकाची झलक सादर केली आहे.

# पाकिस्तानीच्या हातात भारतीय राष्ट्रध्वज

## व्हिडीओ व्हायरल चर्चांना उधाण, कोणत्या स्पर्धेत घडली घटना?

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**बुद्धिबळ ऑलिम्पियाड २०२४ या स्पर्धेनंतर झालेल्या फोटोसेशन दरम्यान पाकिस्तानाच्या संघाने चक्क भारतीय तिरंगा हातात घेऊन फोटो काढला आहे. त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतो आहे. हा व्हिडीओ व्हायरल होताच आता सोशल मीडियावर विविध चर्चांनाही उधाण आलं आहे.**



बुडापेस्ट येथे यंदाची बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमात सहभागी सर्वच संघ उपस्थित होते. यावेळी भारत आणि पाकिस्तान संघाने फोटो सेशनही केलं. मात्र, यावेळी पाकिस्तानच्या संघाचे चक्क भारतीय तिरंगा हातात घेऊन फोटो काढल्याने हा चर्चेचा विषय ठरला. त्यानंतर याचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतो आहे. दोन्ही देशातील तणावपूर्ण संबंध असताना खेळ भावना सर्वोच्च असल्याची प्रतिक्रिया काही नेटकऱ्यांनी दिली आहे.महत्त्वाचे म्हणजे पाकिस्तानी संघाकडून दुसऱ्या कोणत्या देशाचा ध्वज हातात घेऊन फोटो काढण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी पाकिस्तानच्या हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीदरम्यान अंतिम सामन्यात चीनला समर्थन देण्यासाठी चीनचा ध्वज हातात घेऊन फोटो काढले होते. त्यावेळीही पाकिस्तानच्या संघाचं कौतुक झालं होतं. दरम्यान, यंदाच्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये खुल्या विभागात भारताने ऐतिहासिक कामगिरी करत पहिल्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केलं. भारतीय संघात गुकेश डी, आर प्रज्ञानंद, अर्जुन इरिगसी, विदित गुजराथी, पेंटाला हरिकृष्ण आणि श्रीनाथ नारायणन यांचा समावेश होता. अर्जुन इरिगसी आणि डी गुकेश यांनी आपापल्या सामन्यांमध्ये विजय मिळवल्यानंतर आणि दुसऱ्या स्थानावर असलेल्या चीनला यूएसए विरुद्ध दोन गुणांचा फटका बसल्यानंतर भारताचे ऐतिहासिक सुवर्णपदक निश्चित झाले होतं.खरं तर भारतीय संघाने स्पर्धेची स्वप्नवत सुरुवात केली होती. गेल्या सीझनमध्ये चॅम्पियन उझबेकिस्तानविरुद्ध बरोबरी साधण्यापूर्वी पहिले आठ सामने जिंकून चॅम्पियन संघ असल्याची ग्वाही दिली होती. २०२२ च्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताने मायदेशात कांस्यपदक जिंकले होतं.. मात्र, यावेळी पाकिस्तानच्या संघाचे चक्क भारतीय तिरंगा हातात घेऊन फोटो काढल्याने हा चर्चेचा विषय ठरला. त्यानंतर याचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतो आहे. दोन्ही देशातील तणावपूर्ण संबंध असताना खेळ भावना सर्वोच्च असल्याची प्रतिक्रिया काही नेटकऱ्यांनी दिली आहे.महत्त्वाचे म्हणजे पाकिस्तानी संघाकडून दुसऱ्या कोणत्या देशाचा ध्वज हातात घेऊन फोटो काढण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी पाकिस्तानच्या हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीदरम्यान अंतिम सामन्यात चीनला समर्थन देण्यासाठी चीनचा ध्वज हातात घेऊन फोटो काढले होते. त्यावेळीही पाकिस्तानच्या संघाचं कौतुक झालं होतं.बुडापेस्ट येथे यंदाची बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमात सहभागी सर्वच संघ उपस्थित होते. यावेळी भारत आणि पाकिस्तान संघाने फोटो सेशनही केलं. मात्र, यावेळी पाकिस्तानच्या संघाचे चक्क भारतीय तिरंगा हातात घेऊन फोटो काढल्याने हा चर्चेचा विषय ठरला. त्यानंतर याचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतो आहे. दोन्ही देशातील तणावपूर्ण संबंध असताना खेळ भावना सर्वोच्च असल्याची प्रतिक्रिया काही नेटकऱ्यांनी दिली आहे. महत्त्वाचे म्हणजे पाकिस्तानी संघाकडून दुसऱ्या कोणत्या देशाचा ध्वज हातात घेऊन फोटो काढण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी पाकिस्तानच्या हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीदरम्यान अंतिम सामन्यात चीनला समर्थन देण्यासाठी चीनचा ध्वज हातात घेऊन फोटो काढले होते. त्यावेळीही पाकिस्तानच्या संघाचं कौतुक झालं होतंहरिकृष्ण आणि श्रीनाथ नारायणन यांचा समावेश होता. अर्जुन इरिगसी आणि डी गुकेश यांनी आपापल्या सामन्यांमध्ये विजय मिळवल्यानंतर आणि दुसऱ्या स्थानावर असलेल्या चीनला यूएसए विरुद्ध दोन गुणांचा फटका बसल्यानंतर भारताचे ऐतिहासिक सुवर्णपदक निश्चित झाले होतं.खरं तर भारतीय संघाने स्पर्धेची स्वप्नवत सुरुवात केली होती. गेल्या सीझनमध्ये चॅम्पियन उझबेकिस्तानविरुद्ध बरोबरी साधण्यापूर्वी पहिले आठ सामने जिंकून चॅम्पियन संघ असल्याची ग्वाही दिली होती.

### खेळ भावना सर्वोच्च

या स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमात सहभागी सर्वच संघ उपस्थित होते. यावेळी भारत आणि पाकिस्तान संघाने फोटो सेशनही केलं. मात्र, यावेळी पाकिस्तानच्या संघाचे चक्क भारतीय तिरंगा हातात घेऊन फोटो काढल्याने हा चर्चेचा विषय ठरला. त्यानंतर याचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतो आहे. दोन्ही देशातील तणावपूर्ण संबंध असताना खेळ भावना सर्वोच्च असल्याची प्रतिक्रिया काही नेटकऱ्यांनी दिली आहे.महत्त्वाचे म्हणजे पाकिस्तानी संघाकडून दुसऱ्या कोणत्या देशाचा ध्वज हातात घेऊन फोटो काढण्याची ही पहिलीच वेळ नाही.

# कानपूर कसोटीत पावसाचाच खेळ?

## खेळपट्टी कोणाला करणार मदत? हवामान आणि पिच रिपोर्ट

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेश यांच्यातील दुसरा कसोटी सामना २७ सप्टेंबर रोजी कानपूर येथे खेळवला जाईल. भारतीय संघाने मालिकेतील पहिला सामना जिंकला असून १-० ने आघाडीवर आहे. भारतीय संघाने पहिला कसोटी सामना २८० धावांनी जिंकला होता. दुसरा कसोटी सामना जिंकून मालिका क्लीन स्वीप करण्याच्या अश्विनने पहिल्या कसोटीत चमकदार कामगिरी केली होती आणि सामनावीराचा किताब पटकावण्यात तो यशस्वी ठरला होता.**



भारत आणि बांगलादेश यांच्यात आतापर्यंत १४ कसोटी सामने झाले असून त्यात भारतीय संघाने १२ सामने जिंकले आहेत. बांगलादेश संघाला एकही सामना जिंकता आलेला नाही. दोन्ही संघांमधील दोन सामने अनिर्णित राहिले.भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या कसोटीत कानपूरच्या ग्रीन पार्कमधील खेळपट्टी वेगवान गोलंदाज आणि फिरकीपटूंसाठी संतुलन राखणारी असेल अशी अपेक्षा आहे. सामन्याच्या सुरूवातीला ही खेळपट्टी वेगवान गोलंदाजांना आणि सामना जसा पुढे सरकत जाईल तशी फिरकीपटूंना मदत करेल. पृष्ठभाग हा पहिल्या दोन सत्रात वेगवान गोलंदाजांना चांगली उसळी आणि हालचालीसह मदत करेल. तर सामन्याच्या तिसऱ्या दिवशी खेळपट्टीवर फिरकीपटू सामन्यात पुनरागमन करतील अशी अपेक्षा आहे. ग्रीन पार्कची खेळपट्टी, उन्नाव जवळील काली मिट्टी गावातील काळ्या मातीपासून बनवलेली आहे, जी विशेषत: कसोटी सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात फिरकीपटूंसाठी अनुकूल म्हणून ओळखली जाते.

### 59 टक्के पावसाची शक्यता

कानपूरमधील दुस-या कसोटीच्या पहिल्या तीन दिवसात हवामान खराब असून पाऊस पडण्याची दाट शक्यता आहे. कसोटीच्या पहिल्या दिवशी म्हणजे २७ सप्टेंबरला ९३ टक्के पावसाची शक्यता आहे. दिवसभर पाऊस अपेक्षित आहे, जो संध्याकाळपर्यंत आणखी तीव्र होईल. कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी २२८ तारखेला ८० टक्के पावसाची शक्यता दर्शविण्यात आली. दरम्यान, तिसऱ्या दिवशी ५९ टक्के पावसाची शक्यता आहे.